# • आखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा •

राष्ट्रीय विज्ञान संग्रहालय परिषद, कोलकत्ता, राष्ट्रीय विज्ञान केंद्र,नवी दिल्ली,नेहरू विज्ञान केंद्र मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी विज्ञान मेळाव्याचे आयोजन करीत असते व या मेळाव्याचा विषय ठरविते.

उदेद्श :-

१) विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक कार्यकारण भाव समजून विश्लेषणात्मक विचारांची जागृती करणे.

२) देशात विखुरलेल्या प्रज्ञावान युवकांमध्ये एकात्मतेची भवना वृध्दीगत करणे.

३) भावी वैज्ञानिक विचारांची आदान प्रदानाची संधी उपलब्ध करून देणे.

रचना :-

संपूर्ण महाराष्ट्रात तालुका/जिल्हास्तरावर एक दिवसाचा जुलै/ऑगस्ट महिन्यात मेळाव्याचे आयोजन करण्यात येते. यातून पहिल्या ~~पाच~~ दोन क्रमाकांच्या विद्यार्थ्यांची निवड विभागीय स्पर्धेकरिता करण्यात येते विभागीय मेळाव्यातून दोन विद्यार्थ्यांची निवड राज्य मेळाव्यासाठी केली जाते. पुढे राज्यस्तरावर प्रथम आलेला विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावर मेळाव्यात सहभागी होतो.

पात्रता, प्रस्तुतीकरण, मुल्यमापन सविस्तर माहिती जिल्हा विज्ञान पर्यवेक्षक जि.प. पुणे यांच्याकडे मिळेल.